Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार, मराठवाड्यातल्या पाच जणांसह एकूण ३९ मंत्र्यांना शपथ.
- मंत्र्यांना अडीच अडीच वर्ष संधी देणार असल्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती.
- राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून, सरकारने आज आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्षांचा बहिष्कार.

आणि

- उत्तर, मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात येत्या दोन ते तीन दिवसांत थंडीची लाट येण्याचा हवामान विभागाचा अंदाज.

****

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा आज मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला. नागपूर इथं सुरु असलेल्या या शपथविधी सोहळ्यात राज्यपाल सी पी राधाकृष्णन, महायुतीच्या ३९ मंत्र्यांना शपथ देत आहेत.

भारतीय जनता पक्षाकडून चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अतुल सावे, अशोक उईके, आशिष शेलार, शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार गोरे, संजय सावकारे, नितेश राणे, आकाश फुंडकर यांनी शपथ घेतली. शिवसेनेकडून गुलाबराव पाटील, दादा भुसे, संजय राठोड, उदय सामंत, शंभुराज देसाई, संजय सिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर यांनी, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दत्ता भरणे, आदिती तटकरे,

माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ, मकरंद पाटील, बाबासाहेब पाटील यांनी शपथ घेतली.

मराठवाड्यातल्या पाच जणांना या मंत्रिमंडळात स्थान मिळालं आहे. यासंदर्भात आमचे प्रतिनिधी समीर पाठक यांनी घेतलेला हा आढावा...

***आजच्या मंत्रिमंडळ विस्तारात महायुतीतील घटकपक्षांमध्ये तसेच प्रादेशिक समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. मराठवाड्यातून पंकजा मुंडे, मेघना बोर्डीकर, अतुल सावे, धनंजय मुंडे, संजय सिरसाट यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे. परभणी जिल्ह्यातील जिंतूर मतदारसंघातून मेघना बोर्डीकर दुसऱ्यांदा विजयी झाल्या आहेत. तर, गेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभव तसेच लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर पंकजा मुंडे यांची विधानपरिषदेवर नियुक्ती केली आहे, त्यांचाही राज्य मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगरमधल्या औरंगाबाद पूर्व मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा विजयी झालेले अतुल सावे यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी येथील आमदार धनंजय मुंडे यांनी सलग तिसऱ्यांदा राज्य मंत्रिमंडळात स्थान पटकावले आहे. तर, औरंगाबाद पश्चिम मतदारसंघातून सलग तीन वेळा विजयी झालेले शिवसेनेचे आमदार संजय सिरसाट यांना प्रथमच मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे.***

नागपुरात सुमारे तीन दशकांनंतर झालेल्या या शपथविधी सोहळ्यात काही माजी मंत्र्यांचं राजकीय पुनर्वसन आणि शिवेंद्रसिंहराजे भोसले, मेघना बोर्डीकर, संजय शिरसाट, नितेश राणे अशा अनेक नवीन चेहऱ्यांचा समावेश, ही या मंत्रिमंडळ विस्ताराची वैशिष्ट्ये ठरली.

****

मंत्री पंकजा मुंडे यांनी या सोहळ्यादरम्यान पुन्हा एकदा मंत्री झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या...

***मला खूप आनंद आहे, तो आनंद माझ्यावर प्रेम करणाऱ्या लोकांच्या सतत माझ्याबरोबर संघटन त्यांचं उभ करण्यामुळे आहे. चौदामध्ये देवेंद्र***

***फडणवीस जेव्हा मुख्यमंत्री झाले पहिल्यांदा, तेव्हाही मी त्यांच्या टीम मध्ये होते आणि आताही त्यांच्या टिम मध्ये आहे. याचा मला आनंद आहे.***

✽✽✽✽

मंत्रिपदाच्या फॉर्म्युल्यावर महायुतीत एकमत झालं असून, मंत्र्यांना अडीच अडीच वर्ष संधी देण्याचं ठरलं आहे. त्यामुळे आज शपथ घेतलेले मंत्री अडीच वर्षांसाठी असतील, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं आहे. नागपूर इथं आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या विदर्भातल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. लवकरच तिन्ही पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चर्चा करुन महामंडळाची पदे तात्काळ भरली जाणार असल्याचं, पवार यांनी सांगितलं.

✽✽✽✽

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपूर इथं सुरु होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आज सरकारने आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्षांनी बहिष्कार घातला आहे. विधान परिषदेतले विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले, माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. बीडमध्ये सरपंचाचा झालेला खून, परभणी मध्ये दलित तरुणाची झालेली हत्या, यासोबतच बीडमध्ये गेल्या वर्षभरात ३२ जणांची झालेली हत्या, या सगळ्या प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींची समिती नेमून त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी, या नेत्यांनी यावेळी केली. महायुती सरकारमधल्या घटक पक्षांनी निवडणुकीच्या काळामध्ये जी आश्वासनं शेतकऱ्यांना आणि लाडक्या बहिणींना दिली आहेत, ती त्यांनी तातडीने पूर्ण करावी अशी मागणी देखील विरोधी पक्ष नेत्यांनी या पत्रकार परिषदेत केली.

विधानसभेत विरोधी पक्ष नेते पदाबाबत महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत, याउलट अध्यक्षांनी परंपरा लक्षात घेता आघाडीच्या नेत्याला विरोधी पक्षनेते पद द्यावं, अशी मागणी, जितेंद्र आव्हाड आणि अंबादास दानवे यांनी केली.

✽✽✽✽

एक राष्ट्र एक निवडणूक या विषयी दोन विधेयकं उद्या लोकसभेत सादर करण्यात येणार आहेत. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल संविधान विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा विधेयकदेखील उद्या संसदेत सादर करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने गेल्या गुरुवारी लोकसभा आणि राज्यसभेच्या

निवडणुका एकाच वेळी घेण्याविषयीच्या विधेयकाला मंजुरी दिली होती. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या उच्च स्तरीय समितीनं लोकसभा आणि राज्यसभेसाठी देशात एक राष्ट्र एक निवडणूक हा प्रस्ताव मांडला होता.

****

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली. सरदार वल्लभभाई पटेल यांचं व्यक्तिमत्व आणि कार्य, राष्ट्राची एकता, अखंडता तसंच, विकसित भारताची संकल्पपूर्ती याकरता देशवासीयांसाठी प्रेरणास्थान राहील, असं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २९ डिसेंबरला आकाशवाणीवरच्या `मन की बात` या कार्यक्रमातून नागरीकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११७वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना आणि विचार येत्या २७ तारखेपर्यंत, १८००-११-७८०० या नि:शुल्क क्रमांकावर, माय जी ओ व्ही ओपन फोरम वर किंवा नमो ॲप वर नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

उत्तर, मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात येत्या दोन ते तीन दिवसांत थंडीची लाट येणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. परभणी जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून थंडीचा जोर वाढत असून, आज सर्वाधिक नीचांकी तापमान चार पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या हवामान विभागाने ही माहिती दिली. उत्तर भागात होणारी हिमवृष्टी आणि उत्तरेकडून येणारं थंड वारं तसंच आपल्या भागात असलेलं कोरडं वातावरण यामुळे पारा खाली जात असल्याचं हवामान विभागानं सांगितलं आहे.

छत्रपती संभाजीनगर इथल्या कृषी हवामान शास्त्र विभागाचे विषय विषयतज्ञ प्राध्यापक अशोक निरवल यांनी हवामानाच्या अंदाजाबद्दल माहिती दिली.

***उत्तरेकडील येणारे जे थंडीच्या वाऱ्याचा प्रवाह तीव्र झालेला असल्यामुळे आणि मालदीव परिसरावर कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय असून हे प्रणाली विरून जाण्याची शक्यता आहे. तसेच दक्षिण अंदमान समुद्र आणि परिसरावरील असलेल्या चक्राकार वाऱ्यामुळे कमी दाबाचे क्षेत्राची निर्मिती होण्याची संकेत आहे. तामिळनाडूच्या***

***किनाऱ्याकडे येतानाही प्रणाली आणखी तीव्र होणार असून त्याचाच परिणाम म्हणून राज्यात गारठा वाढला असून पुढील तीन ते चार दिवस हा गारठा कायम राहण्याची शक्यता आहे.***

****

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर–गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात आजच्या दुसऱ्या दिवस अखेर ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात सात बाद ४०५ धावा झाल्या आहेत. जसप्रित बुमराहनं पाच गडी बाद केले.

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथल्या श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाची आज सांगता झाली. तहसीलदार विलास तरंगे यांनी योगेश्वरी देवीची विधीवत होमहवन आणि महापूजा करून पूर्णाहुती दिली. त्यानंतर सायंकाळी श्री योगेश्वरी देवीची पालखी मिरवणूक अंबाजोगाई शहरातून काढण्यात आली. यावर्षी मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदीर परिसरात सलग नऊ दिवस पाच ते सहा हजार महिला आराध बसल्या होत्या.

****

बीड इथं आज प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आनंद यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालत घेण्यात आली. यात जिल्ह्यातून सुमारे १२ कोटी ९८ लाख रकमेची दोन हजार ३९३ प्रकरणं निकाली काढण्यात आली.

****

पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात रुपटॉप सोलरचे ७ हजार ९२६ अर्ज मंजूर झाले असून, दोन हजार ११५ जणांचं काम पूर्ण झाल्याची माहीती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. या योजनेच्या जिल्हास्तरीय समितीच्या आढावा बैठकीत ते आज बोलत होते. ही योजना सोलापूर जिल्ह्यातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावी यासाठी वीज वितरण कंपनीने योग्य नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

****

सिकलसेल जनजागृती अभियानाअंतर्गत पालघर जिल्ह्यात २००९ पासून जवळपास १३ लाख ९६ हजार ३५३ इतक्या सिकलसेलच्या तपासण्या करणात आल्या.

त्यात २४ हजार २२८ वाहक आणि एक हजार ६०६ सिकलसेल ने ग्रसित रुग्ण आढळून आले.

****